# वाङ्मय मंडळ अहवाल (२०१६-१७)

*प्रा.श्रीमती के.व्ही.चव्हाण*
*वाङ्मय मंडळ प्रमुख*

विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा.विद्यार्थ्यामध्ये वाङ्मयीन जाणिवा वृद्धिगंत व्हाव्या यासाठी वाङ्मय मंडळ नेहमीच उपक्रमशील असते.या उपक्रमांचा एक भाग म्हणून मंडळातर्फे वादविवाद,वक्तृत्व स्पर्धा,निबंध,काव्यवाचन,हस्ताक्षर इ.स्पर्धा घेतल्या जातात.स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व मार्गदर्शन केले जाते.विद्यार्थ्यांच्या लेखन गुणांचा विकास करणे,लेखन वाचनातून साहित्यिक अभिरुची घडवणे,चित्रपट व नाटक यांचा आस्वाद घेणे व परीक्षण करणे,यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्याने आयोजित करणे या हेतूने मराठी-हिंदी-इंग्रजी विभागातर्फे महाविद्यालयात वाङ्मय मंडळ कार्यरत असते.अभ्यासक्रमावर आधरित चित्रपट,नाटके दाखविण्यासाठी मंडळा अंतर्गत ***इथिका क्लब*** आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या मदतीने ***अक्षरगंगा*** ही भित्तीपत्रिका चालवली जाते.१४ सप्टे. हिंदी दिन,२७ फेब्रु.मराठी भाषा दिन साजरा केला जातो.

२०१६-१७ या शैक्षणिक वर्षात लासलगाव महाविद्यालयातील कवी प्रा.किशोर गोसावी यांच्या हस्ते वाङ्मय मंडळाचे उद्घाटन झाले.त्यावेळी त्यांनी कवितांचे सादरीकरण करीत काव्यनिर्मितीची प्रक्रिया व कवीचे योगदान या बद्दल मार्गदर्शन केले.

१४ सप्टे.हिंदी दिनानिमित्त नासिकाचे शायर इर्शाद वासिम यांच्या शेरोशायरीचा कार्यक्रम झाला.

१५ ऑक्टोबर डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करून सादरा करण्यात आला.

इंग्रजी विभागातर्फे ५ जाने.ते ११ जाने.२०१७ जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपिअर यांच्या ४०० व्या पुण्यतिथीनिमित्त ***'शेक्सपिअर सप्ताह'*** साजरा केला.याचे उद्घाटन सायखेडा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.भाबड यांच्या हस्ते झाले.त्यांनी शेक्सपिअरच्या नाट्यकृती व सोनेट बद्दल विवेचन केले.शेक्सपिअरच्या साहित्यावर आधारित पीपीटी सादर केल्या.इंग्रजी भित्तीपात्रीकेचे यावेळी प्रकाशन झाले.

इथिका फिल्म क्लब तर्फे शेक्सपिअरचे द मर्चंट ऑफ व्हेनिस ,किंगलीयर इ नाटके व जीवन चित्रावर आधरित स्लाईट दाखविल्या. किंगलियर नाटकावर आधरित मराठी नटसम्राट नाटक

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

दाखविण्यात आले.प्रा.आर.बी.शिंदे लिखित व दिग्दर्शित '*नेटीझन*' या एकांकिकेचा व्हिडीओ दाखविण्यात आला.

मराठी,हिंदी व इंग्रजी विभगातील प्रा.कैलास सलादे,प्रा.मंजूर सय्यद,प्रा.मनीषा चिने,प्रा.जयश्री पवार,प्रा.आर.बी.शिंदे,प्रा.विजय सोनावणे,प्रा.योगेश मोहन या सर्वांचे सहकार्य लाभले.

वाङ्मय मंडळाच्या उपक्रमासाठी मा.प्राचार्य डॉ.संभाजी पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.धन्यवाद

Chavan
प्रा. श्रीमती चव्हाण के. टी.
वाङ्मय मंडळ प्रमुख

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

प्राचार्य
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
ओझर (मिग), ता. निफाड, जि. नाशिक